नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २०/०३/२०२६ (शुक्रवार )

## ४८ तासात मोटर सायकल चोरीचा गुन्हा उघड, १ आरोपी अटक, स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** :— दिनांक १७/०३/२०२६ रोजी फिर्यादी राजू गुलाबराव गाडे, वय ४६ वर्ष, रा. विश्वकर्मा नगर, वार्ड नं. ०१, यवतमाळ ह. मु. एलटीजी आर लेबर, भारकस रोड, एमआयडीसी बोरी यांनी पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे तक्रार दिली की, दिनांक १४/०३/२०२६ रोजी १४.०० वा. ते १५.०० वा. चे सुमारास एलटीजी आर लेबर कॅम्पस एमआयडीसी बोरी येथुन फिर्यादीची पल्सर बजाज कंपनीची मोटर सायकल क्र. एम एच ३४/बी क्यु १४९० कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेली. फिर्यादीचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे कलम ३०३ (२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद आहे. सदर गुन्हयाचा तपास एमआयडीसी बोरी पोलीस सदर गुन्हयाचा तपास करीत असतांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सुध्दा समांतर तपास सुरू केला.

मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सदर गुन्हयात समांतर तपासादरम्यान दिनांक १९/०३/२०२६ रोजी तांत्रिक पुरावे व गुप्त माहितीच्या आधारे सदर गुन्ह्यातील **आरोपी नामे विकास कानाजी पाटील, वय ३९ वर्ष, रा. सेलु मुरपाड, ता. हिंगणघाट, जि. वर्धा ह. मु. वार्ड नं. ४, बोरी हा असल्याची खात्रीशीर माहिती प्राप्त झाली. आरोपीचा शोध घेऊन त्यास बुट्टीबोरी येथुन ताब्यात घेतले. आरोपी कडे कौशल्यपुर्ण तपास करीत गुन्ह्यासंबंधाने सखोल विचारपूस केली असता त्याने** पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी परिसरातून मोटरसायकल चोरी केल्याचे

कबुल केले. पोलीसांनी पंचासमक्ष गुन्हयातील बजाज कंपनीची मोटरसायकल क्र. एम एच ३४/बीक्यु १४९० किंमती ३०,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. **आरोपीस अटक करण्यात आली आहे. गुन्हा नोंद झाल्यानंतर अवघ्या ४८ तासात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गुन्हा उघड करून संपूर्ण मुद्देमाल जप्त केला आहे.**

**नागपुर ग्रामीण पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, जर कोणी कमी किंमतीत दुचाकी किंवा इतर वाहन विक्री करीत असेल तर त्याची संपुर्ण कागदपत्रांची पडताळणी करून शाहनिशा करावी. वाहन खरेदी करतेवेळी काही संशयास्पद वाटल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला तात्काळ माहीती दयावी.**



## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद अरोली पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन अरोली** :— दिनांक २०/०३/२०२६ रोजी अरोली पोलीस पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, श्रीखंडावरून धर्मापुरी गावाकडे ट्रॅक्टर ट्रॉलीमध्ये अवैधरीत्या रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी धर्मापुरी गावात नाकाबंदी केली असता एक ट्रॅक्टर ट्रॉलीसह मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली.

ट्रॅक्टरचा **चालक नामे संजय भगवान भोयर, वय ४२ वर्ष, रा. श्रीखंडा, तह. मौदा, जि. नागपूर हा मिळुन आला. पोलीसांनी आरोपी चालकास रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत** विचारपुस केली असता त्याच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली. ट्रॅक्टरचे मालकाबाबत विचारपुस केली असता स्वत: ट्रॅक्टर ट्रॉलीचा मालक असल्याचे सांगितले. **पोलीसांनी पंचासमक्ष वर नमुद वाहन १)** स्वराज ७३५ कंपनीचा विना क्रमांकांचा ट्रॅक्टर किंमती ३,००,०००/—रूपये व विना क्रमांकाची ट्रॉली किंमती १,५०,०००/—रूपये २) ०१ ब्रास रेती किंमती ५,०००/— रूपये असा एकुण ४,५५,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

**नमुद आरोपी चालक व मालक संजय भगवान भोयर, वय ४२ वर्ष, रा. श्रीखंडा, तह. मौदा, जि. नागपूर याच्या विरूध्द पोस्टे अरोली येथे कलम ३०३(२), २८१ भा.न्या.सं, सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



## पोस्टे बुट्टीबोरी हद्दीत सट्टापट्टी चालविणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद
## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन बुट्टीबोरी :—** दिनांक १९/०३/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास गोपनीय माहिती मिळाली की, बुट्टीबोरी येथील एचडीएफसी बँके जवळील पानठेला येथे कैलास रामदास पूनवटकर हा लोकांकडुन पैसे घेवुन सट्टापट्टीचे आकडे लावुन हारजीतचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचले असता आरोपी नामे १) कैलास रामदास पूनवटकर, वय ५५ वर्षे, रा. बुट्टीबोरी हे कागदावर आकडे लिहुन सट्टापट्टी चालवित असतांना मिळुन आला. आरोपीला अधिक विचारपुस केली असता आरोपी क्रं २) हिंमाशू वैद्य रा. बुट्टीबोरी याच्या सांगण्यावरून तो सट्टापट्टी चालवित असल्याबाबत माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी घटनास्थळावरून रोख रक्कम १८४० /— रूपये, सट्टापट्टीचे लिहण्याकरीता वापरलेले पेन असा एकुण १८४५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**नमुद आरोपी क्रं १) कैलास रामदास पूनवटकर, वय ५५ वर्षे, रा. बुट्टीबोरी २) हिंमाशू वैद्य रा. बुट्टीबोरी यांच्या विरूद्ध कलम १२ अ महाराष्ट्र जुगार अधिनियम सहकलम ४९ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या
## ०५ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद.

**पोलीस स्टेशन उमरेड** :— दिनांक १९/०३/२०२६ रोजी उमरेड पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहिती मिळाली की, मौजा ठाना परिसरात काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे उमरेड पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) प्रफुल दत्तुजी श्रीरामे, वय २९ वर्ष, २) विष्णु रूपचंद उके, वय ५० वर्ष, ३) राजेश अरविंद कनोजे, वय ४० वर्ष, ४) गौरव मधुकर गारघाटे, वय २५ वर्ष, ५) दिलीप मानिकराव गेडेकर, वय ४७ वर्ष, सर्व रा. ठाना ता. उमरेड जि. नागपूर** यांना जागीच पकडले. पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तास पत्ते आणि रोख रक्कम

३०५०/—रूपये विविध कंपन्यांचे एकुण ०५ मोबाईल किंमती ३४,०००/—रूपये असा एकुण ३७०५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**नमुद ०५ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन उमरेड येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये ०२ गुन्हे नोंद

पोलीस स्टेशन कन्हान :— दिनांक १९/०३/२०२६ **रोजी कन्हान पोलीस पेट्रोलींग करीत असतांना आरोपी क्र. १) नामे मनिष उर्फ मोनिष रामासिंग गौतम, वय २२ वर्ष, रा. दया नगर खदान नं. ०३ ता.पारशिवनी २) दिनेश सदाशिव मसराम, वय ३५ वर्ष, रा. खदान नं. ३, कन्हान ता. पारशिवनी** हे मौजा.खदान नं. ०३ मरगटी मैदानात सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आल्याने नमुद आरोपीतांवर कलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये प्रत्येकी १ असे ०२ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ११ गुन्हे नोंद

नागपुर ग्रामीण जिल्हयात दिनांक १९/०३/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन **मोहाफुल दारू, देशी दारू असा एकुण १२५७०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी नामे १) जर्नादिन उमराव खरपुरिया, वय ६८ वर्ष, रा. डोंगरगाव २) महिला आरोपी याचे वर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे महिला आरोपी हिचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे विनोद रामचंद्र सातपुते, वय ४० वर्ष, रा. नरखेड यांचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन वडोदा** येथे आरोपी नामे ओमप्रकाश गोविंदा सिंदुरकर, वय २८ वर्षे, वार्ड क्र. १, भोवरी ता. कामठी याचे वर एक गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** येथे

आरोपी नामे रोशन प्रकाश खोब्रागडे, वय ३६ वर्ष, रा. वार्ड क्र ०४, टाकळघाट ता. हिंगणा, जि. नागपुर याचे वर एक गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कुही** येथे आरोपी नामे १) हरिदास मोतीराम मांढरे, वय ५० वर्ष, रा. मांढळ, ता. कुही, जि. नागपुर २) यशपाल मारोती बांगळकर, वय ३१ वर्ष, रा. चापेगडी, ता. कुही, जि. नागपुर याचे वर प्रत्येकी एक असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन खापा** येथे आरोपी नामे ईश्वर जागोजी वालदे, वय ३८ वर्ष, रा. खुबाळा, तह. सावनेर, जि. नागपुर याचे वर एक गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन पारशिवनी** येथे आरोपी नामे मंगेश ज्ञानेश्वर पुरी, वय २७ वर्ष, रा. डुमरी (कला) ता. पारशिवनी जि. नागपूर याचे वर एक गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन अरोली** येथे महिला आरोपी नामे याचे वर एक गुन्हा नोंद अशा ११ आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये **११ गुन्हे दाखल केले आहे.**

**नमुद कारवाईत एकुण १) ६० लिटर मोहाफुल गावठी दारू २) १४८३० मिली देशी दारू असा एकुण १२५७०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने